IMPACT FACTOR SJIF 2019-6.380
ISSN 2319-4766

SRJIS

# GLOBALIZATION & ITS IMPACT ON INDIAN ECONOMY (GIIE 2020)

Special Issue of
An International, Peer Reviewed & Referred

## SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

JAN-MAR,2020,V-8/46

**Editor-In-Chief**
Prin. Dr. G. N. Shinde

**Editor**
Dr. P. R. Muthe

**Co-Editors**
Dr. D. D. Bhosale
Dr. D. A. Pupalwad



ISSN: 2319-4766

# भारतातील ऐतिहासिक पर्यटनावर जागतिकीकरणाचा परिणाम

**प्रा. डॉ. वसंत व्यंकटराव कदम**

*इतिहास विभाग प्रमुख, हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमामयतनगर ता. हिमायतनगर जि.नांदेड*

२० व्या शतका पासून जगातील सर्व राष्ट्रीनी पर्यटन उद्योगाला महत्वाचे स्थान दिले आहे. कारण पर्यटन हा आधुनिक काळातील अत्यंत फायदेशीर उद्योग बनला असून पर्यटना मुळे राष्ट्रांची आर्थिक स्थिती सुधारत येते. म्हणून आज संपूर्ण विकसनशिल देश पर्यटन उद्योगाच्या विकासाकडे लक्ष देत आहेत.

अगदी प्राचीन काळापासून पर्यटन हा मानवाच्या जीवनातील अत्यंत महत्वाचा भाग आहे. या पृथ्वी तलावरील प्रत्येक मानवाला पर्यटन करण्याची आवड असते, प्रत्येक व्यक्ती आपल्या बौध्दीक क्षमतेनुसार, आपल्या आर्थिक कुवतीनुसार, कालपरत्वे काही नवीन जाणून घेण्यासाठी, काही मिळविण्यासाठी उत्सुक आसते आणि याच जिज्ञासेतून मानव एका ठिकानावरून दूस—या ठीकानी दूस—या ठीकाना तिस—या ठीकानी आपल्या आवडी—निवडी नुसार संचार करून आनंद मिळवीण्याचा पर्यत्न करीत असतो, म्हणून असे म्हणता येईल की, पर्यटन म्हणजे एखाद्या ठीकानावरून दूस—या ठिकाणी आनंद मिळविण्यासाठी व विशिष्ट हेतू साध्ये करण्यासाठी केलेला प्रवास होय. सर्व प्रथम प्राचीन काळात रोमन साम्राज्यातील लोकांनी आनंद मिळविण्यासाठी आपल्या मनोरंजनासाठी, मोजमजा करण्यासाठी पर्यटान ही संकल्पना रूजवली. प्राचीन काळापासून ते आजतागायात पर्यटनाच्या हेतूने जगातील विविध देशातील पर्यटक पर्यटनासाठी व विविध हेतू आणि उद्देश साध्य करण्यासाठी भारतात येण्याची परंपरा फार प्राचीन असल्याचे दिसून येते फाहियांग, हयु,एन,त्सेंग,व इत्सिंग हे चिनी प्रवासी पर्यटक म्हणून भारतात आले होते या तिन्ही चिनी पर्यटकांनी तत्कलीन भारतातील राजकिय स्थिती आणि येथील बौध्द धर्म व भारतीय संस्कृतीन ते प्रभावीत झाले. परदेशी पर्यटकाबरोबरच भारतातील अनेक स्वदेशी पर्यटक या देशातील अंतर्गत ऐतिहासिक पर्यटन स्थळाना भेटी देण्यासाठी पर्यटन करतात.

प्रस्तूत शोध निबंधात भारतातील ऐतिहासिक पर्यटनावर जागतिकीकरणाचा झालेला परिणामाचा आर्थिक अभ्यास करण्यात आला आहे. सदरील शोधनिबंधाचे लिखान आणि अभ्यासासाठी दुय्यम माहिती साधनांचा उपयोग करण्यात आला आहे. पर्यटन म्हणजे एका ठिकानावरून दुस—या ठिकानी काही वेळासाठी किंवा काही कालावधिसाठी केलेला प्रवास होय, तर पर्यटनस्थळे म्हणजे जी स्थळे प्रवास करीत असतांना पर्यटकांना स्वत:कडे आकृर्षित करतात त्यांना पर्यटन स्थळे असे म्हणतात. भारत देशाला फार मोठा इतिहास व संस्कृतीचा वारसा लाभल्यामुळे या देशात हजारो पर्यटन स्थळे आहेत. आणि ते आजही पर्यटककांना पहावयास मिळतात. भारतातील पर्यटन हे या देशातील अर्थव्यवस्थेसाठी आत्यंत महत्वाचे साधन ठरत आहे. त्यामुळे पर्यटन हा उद्योग या देशातील अग्रेसर व्यवसाय म्हणून वेगाने वाढत आहे.

जगतीक पर्यटनाचा अभ्यास करता पर्यटन या उद्योकातूनअनेक राष्ट्रांना फार मोठया प्रमाणात आर्थिक नफा मिळत आहे. इ.स. २००१ मध्ये जवळपास ८० कोटी लोंकानी राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय पर्यटन केले या पर्यटनातून जवळपास ७०० अब्ज अमेरिकन डॉलर्स इतका पैसा खर्च करण्यात

आला, आजच्या परिस्थिती जागतीक उत्पन्नाच्या १२ ते १३ टक्के रक्कम ही पर्यटन या उद्योगातून प्राप्त होत असते यामुळे राष्ट्राची आर्थिक घडी व्यवस्थित बसण्यास मदत होते. युरोपीयन देशानी अधुनिक पर्यटनाचा पाया रचला असला तरी भारत देशाला पर्यटनाची खुप प्राचीन परंपरा लाभलेली आहे. हे चिन च्या पर्यटका वरून दिसून येते. अधुनिक कालखंडाचा विचार करता भारताच्या स्वातंत्र्या पूर्वी या देशात पर्यटन विकासाला ब्रिटीशांनी चालना दिली त्यांनी इ.स. १९४५ मध्ये सर जॉन सार्जंट यांच्या आध्यक्षते खाली एक समीती नियुक्ती केली या समीतीने इ.स. १९४६ मध्ये ब्रिटीश सरकारला आकडे सादर केला या आहवालात समीतीने पर्यटन विकासासाठी अनेक शिफारशी केल्या त्यानुसार भारतीय पर्यटनाचा विकास करण्यासाठी ब्रिटीशीनी भारतात मध्यवर्ती पर्यटन संघटना स्थापन केली य मुळे या देशात पर्यटन उद्योगाला व पर्यटन व्यवसायाला गती मिळाली, त्यानंतर काही कालावधिचे भारत देशाला स्वांतत्र्य मिळाले पुढे भारत सरकारने पर्यटन हे देशातील अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्वाचे आहे. हे लाक्षात घेऊन भारतीय पर्यटन विकासासाठी विविध पंचवार्षिक योजनेतून भारतिय पर्यटनाचा विकास करण्याचे निश्चित केले सर्वप्रथम दूस—या पंवार्षिक योजनेन पर्यटन उद्योगविकासाचा

समावेश करून देशातील पर्यटननचा विकास करण्यासाठी राज्यसरकार आणि स्थानीक संस्थांच्या माध्यमातून पर्यटनासंबंधी माहिती प्रसारित करण्यावर भर देण्यात आला, तसेच देशातील वाहतूक खात्याकडे पर्यटन उद्योगाचे कामकाज देण्यात आले. त्यानंतर तीस—या पंचवार्षिक योजनेमध्ये पर्यटकाना आधिक प्रमाणात सेवा सुवीधा उपलब्ध करून देण्यासाठी परदेशी पर्यटकांसाठी केंद्रसरकारने तर देशातील देशी पर्यटकांसाठी त्या त्या राज्यसरकारने नविन हॉटेल्स निर्मान करणे, बांधने व जुण्या हॉटेलची सुधारणा करण्यासाठी केंद्र व राज्यसरकारकडून अर्थ साहय मंजुर करण्यात आले. चौथ्या पंचवार्षिक योजनेत पर्यटन व्यवसाय व उद्योगाचे आर्थिक महत्व लक्षात घेऊन पर्यटकांसाठी वाहतूक, निवास व मनोरंजन (करमनुक) इत्यादी सुविधा कडे लक्ष पुरवीण्यात आले. पाचव्या पंचवार्षिक योजनेत पर्यटन विकासासाठी पंचविस कोटी रूपयांची नगदी तरतूद करून या पैशातून भारतात प्रसिध्द आसना—या ऐतिहासिक पर्यटनस्थळी विश्रामालये बांधकाम तसेच पर्यटकांसाठी वाहतूकीची सोय करणे, पर्वतमय व अदिवासी भागातील पर्यटन स्थळांचा विकास करणे यावर लक्ष केंद्रीत केले गेले सहाव्या पंचवार्षिक योजनेत पर्यटन विकासाबरोबरच पर्यावरण संतुलनावर भर देण्यात आला. सातव्या पंचवार्षिक योजनेत पर्यटनाचा विकास खाजगी गुंतवणुकीद्वारे करण्यावर भर देण्यात आला, तसेच पर्यटन विकासासाठी ३४५ कोटी रूपयांची तरतून करण्यात आली. आठव्या पंचवार्षिक योजनेत अ विकासाचे कार्य खाजगी क्षेत्राकडे सुपूर्त करण्यात आले त्याच बरोबर पर्यटन व्यवसाय आणि उद्योगाचा आधिकधिक विकास करण्यासाठी नऊ कलमी कार्यक्रम राबविण्यात आला. अशा प्रकारे देशात विविध पंचवार्षिक योजनाच्या माध्यमातून भारतिय पर्यटनाचा आणि पर्यटनस्थळाचा विकास करण्यासाठी नवनविन योजना राबविण्यात आल्या त्यामूळचे पर्यटन विकासाला आधिक गतीमान व चालना देण्यासाठी भारत सरकारणे साद्याच्या स्थितीत परदेशी पर्यटकांना भारतात येण्यासाठी व्हिसा धोरण अधिक लवचीक केल्याचे दिसून येते. वेळोवेळी सरकारने व्हिसा धोरणात बदल करून भारताच्या शेजारील राष्ट्रांना आपल्या देशात सहज पर्यटनासाठी येता यावे म्हणून भुतान, मालदीव, नेपाळ च्या नागरिकांना भारतात प्रवेश करण्यासाठी किंवा पर्यटन करण्यासाठी

व्हिसा घेण्याची अवश्यकता नाही. तसेच अफगाणिस्थान अर्जेन्टिना, बांग्लादेश, उत्तर कोरिया, मालदीप, मॉरिशिस, मंगोलिया, नेपाळ, दक्षिण अफ्रिका आणि उरूग्वे येथील नागरिकांना, पर्यटकांना भारतीय व्हिसा मिळविण्यासाठी व्हिसा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. असे धोरण जाहीर केले आहे. पर्यटन उद्योगाला चालना देण्यासाठी विविध रूपाने भारतीय पर्यटन स्थळांचा विकास करून परदेशी पर्यटकांना आकर्षित केले त्यामुळे परदेशातील पर्यटकांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झाली. जगाच्या कानाकोप—यातून विविध देशातील पर्यटक भारतात येऊ लागले. इ.स. १९६० मध्ये १ लाख २३ हजार ९५ विविध देशातील पर्यटक पर्यटनासाठी भारतात आले इ.स. १९८० मध्ये पर्यटक भारतात येण्याची संख्या ८ लाख १५० झाली तर १९९५ मध्ये पर्यटक येणची संख्या खुप मोठया प्रमाणात वाढून ती २१ लाख २३ हजार ६६३ इतकी झाली त्यात पुन्हा पुढील काहात वाढ होऊन इ.स. २००० मध्ये २४ लाख ३५ हजार ८०० पर्यटक जगातील विविध देशातून भारतात आले दिवसेंना दिवस परदेशी पर्यटक भारतात येण्याची संख्या खुप मोठया प्रमाणत वाढत आहे.

कोणत्याही विकसनसिल देशाचे मुख्य उदिष्टये पर्यटनाचा विकास करणे हे असते कारण पर्यटन उद्योक आणि व्यवसायामुळे परदेशातील अधिक अधिक चलन मिळत असते. इ.स. १९७५—७५ मध्ये २ हजार ६०० दशलक्ष एवढे परकिय चलन परदेशी पर्यटकांच्या माध्यमातून भारत देशाल मिळाले, त्याच बरोबर इ.स. १९८९—९० मध्ये २४ हजार ६०० दशलक्ष एवढे परकिय चलन आपल्या देशाला प्राप्त झाले The National Council of Applied Economic Research या संस्थेच्या आंदाजानुसार इ.स. १९७५ मध्ये भारतात ९ लाख ३३ हजार लोकांना पर्यटन उद्योगामार्फत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झाला. Worid Trival And Tourism Council- २०१८ च्या अहवालानुसार भारत देशाला एकूण GDP च्या ९.२ टक्के म्हणजे १६.९१ लाख कोटी रूपये पर्यटक आणि पर्यटनाच्या माध्यमातून मिळऊन दिले आहेत. तसेच या देशात पर्यटन व्यवसाय व उद्योगाचा विकास झाल्यामुळे देशातील बेरोजगार लोकांना रोजगार मिळत असतो, भारतातील पर्यटन उद्योग आणि व्यवसायाने ४२.६७ दशलक्ष लोकांना राजगार मिळऊन दिला आहे. हा रोजगार देशाच्या एकूमण रोजगारा पैकी ८.१ टक्के इतका आहे. तसेच भारताच्या वैद्यकीय पर्यटनाची किंमत जवळपास ०३ अब्ज अमेरिकन डॉलर्स आहे. भारतातील तामीळनाडू, महाराष्ट्र, राज्यस्थान, दिल्ली आणि उत्तरप्रदेश ही पर्यटकांसाठी सर्वाधिक लोकप्रिय राज्य आहेत. इ.स. २०१५ मध्ये विदेशी पर्यटकांनी दिल्ली, चेन्नई, आग्रा आणि जयपूर ही सर्वाधिक भेट दिलेली शहरे होती, भारतात येणा—या पर्यटकांमध्ये इंग्लंड, युरोप, व अमेरीका या देशातील पर्यटकांचे प्रमाण सर्वाधिक आहे. तसेच संयुक्त संस्थाने, फ्रान्स, जर्मनी, जपान, इटली, कॅनडा आणि मलेशिया या देशातून पर्यटक भारतात येतात त्याच बरोबर श्रीलंका, चीन, जपान या देशातून येणा—या पर्यटकांचा मुख्य उदेश भारतातील बोध्द धर्माच्या स्थळाना भेटी देणे हा असतो.पर्यटन हा आधुनिक काळातील अत्यंत महत्वाचा व्यवसाय बनला आहे. पर्यटनाच्या माध्यमातून राष्ट्राला जलद गतीने परकिय चलन मिळवता येते. पर्यटन हा उद्योग म्हणजे परकिय चलन मिळऊन देणारा अत्यंत महत्वाचा उद्योग आहे. या उद्योगात कोणत्याही कच्चा मालाची गुंतवनुक करण्याची अवश्कता नाही. देशात उपलब्ध असलेल्या ऐतिहासिक स्थळाच्या आकर्षना द्वारे राष्ट्राची आर्थिक स्थिती सुधारना येते. त्याचबरोबर पर्यटनातून भारत देशातील काही

प्रमाणात बेरोजगारीची समस्याही सोडविता येते, पर्यटन व्यवसाय हा मोठया प्रमाणात विदेशी चलन मिळवून देनारा उद्योग आसल्या मुळे विदेशी चलन पुरवठा हा जलद आर्थिक विकास व विदेशातील आर्थिक व्यवहारासाठी अत्यंत महत्वाचा ठरतो. त्यामुळे त्या दृष्टीने भारतातील पर्यटना स्थळांचा पर्यायाने ऐतिहासिक स्थळाचा विकास करणे ही काळाची गरज आहे.

**संदर्भ :—**

१. *डॉ. साखरे विजय., ऐतिहासिक पर्यटन, अक्षरलेण प्रकाशन उर्जानिगर, सोलापूरन (प्रथम अवृत्ती).२०१२.*
२. *डॉ. कठारे अनिल, डॉ. साखरे विजय व डॉ. पाटील., पुरातत्वविद्या वस्तुसंग्रालय आणि पर्यटन, विद्या बुक पब्लिकेशन औरंगाबाद. — २०१५.*
३. *डॉ. लिगाडे ओमशिवा, डॉ. कदम अरविंद व साकोळे संगमेश्वर., पर्यटनशास्त्र, लातूर आरूण प्रकाशन. — २०१८.*
४. *डॉ. कोंडेकर आर.एस., पर्यटन, लातूर आरूण प्रकाशन. — २०१८*
५. *www. history.com*
६. *www. britannica.com*